जाहिरात :-

## शुध्दीपत्रक

**पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर,येथील विधी अधिकारी गट-अ, गट-ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत.**

जा.क्र.कक्ष-१(१)विधी अधि.गट-अ,गट-ब/विधीअधि./पदे/जाहिरात/२०२२/1527 औरंगाबाद दि. 2/०2/२०२२

पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर,कार्यालयाच्या आस्थापनेवर विधी अधिकारी गट-अ-१, गट-ब-१, व विधी अधिकारी २ यांची रिक्त पदे, शासन निर्णय,गृहविभाग,क्र.एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल-१०/ दि.१५/०२/२००६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार,११ महिण्याचे करारावर पुर्णत:कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत.सविस्तर जाहिरात या कार्यालयाचे संकेत स्थळ aurangabadcitypolice.gov.in वर तसेच मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई कार्यालयाचे संकेत स्थळ mahapolice.gov.in वर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदर पदाचे अर्ज या कार्यालयचे ई मेल cp.aurangabad@mahapolice.gov.in वर दि.०४/०२/२०२२ पर्यंत मागविण्यात होते व मुलाखत दि.०९/०२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

तथापि,मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२-अ/३२२८/वि.अ./परिपत्रक/२०२२ दि.२८/०१/२०२२ अन्वये सदर पदासाठी लेखी परीक्षा व तोंडी परीक्षा घेवुन नेमणुकी बावत सुचना प्राप्त झाल्याने लेखी व तोंडी परीक्षेचा सुधारीत कार्यक्रम खालील प्रमाणे राहील.

१. लेखी परीक्षा ५० गुणांची व तोडी परीक्षा २५ गुणांची असेल.

२. लेखी परीक्षेत व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यात यईल.

३. नियुक्ती देणेसाठी कमीतकमी ६०% गुण असणे आवश्यक राहील.

तरी लेखी परीक्षा व तोंडी परीक्षा आता दिनांक ०९/०२/२०२२ **ऐवजी दिनांक २४/०२/२०२२ रोजी ११.००** वाजता घेण्यात येईल. परीक्षेचे ठिकाण या कार्यालयाचे संकेतस्थळ aurangabadcitypolice.gov.in या वर कळविण्यात येईल याची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी .

**( अपर्णा गिते )**
पोलीस उप आयुक्त,(मुख्यालय)
औरंगाबाद शहर.

Scanned with CamScanner